समृद्धी महामार्गावरील अपघातात एक जागीच ठार
>>पान 2

खामगाव उप प्रादेशिक परिवहन येथे दुचाकी, चारचाकी वाहनासाठी नविन मालिका सुरु
>>पान 3

केस व नख गळतीच्या आजारावर नियंत्रणासाठी केंद्रीय पथकाला निर्देश; केंद्रीय राज्यमंत्री जाधव
>>पान 4

**सुविचार**
स्वप्नांना सत्यात उतरवण्यासाठी मेहनत करा.


# दैनिक आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com
मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 250 ■ बुधवार, दि. 23 एप्रिल 2025 ■ पाने 4 ■ किंमत रु. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006




टायगर श्रॉफला मारण्याची सुपारी? पोलिस तपासात खळबळजनक खुलासा समोर
आतील पान

# जम्मू-कश्मीरच्या पहलगाम येथे अतिरेक्यांचा गोळीबार, २० हून अधिक पर्यटक ठार



जम्मू-कश्मीरम : जम्मू-कश्मीरमध्ये अतिरेक्यांनी पुन्हा डोके वर काढले आहे आणि प्रथमच पर्यटकांना टार्गेट केले आहे. अतिरेक्यांनी केलेल्या गोळीबारात २० हून अधिक पर्यटक ठार झाल्याचे वृत्त असून त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. कश्मीरमध्ये अनेक वर्षांनंतर प्रथमच पर्यटकांना टार्गेट करण्यात आल्याचे म्हटले जात आहे. अमरनाथ यात्रेच्या पार्श्वभूमीवर दहशत निर्माण करण्यासाठी हा हल्ला झाल्याचे म्हटले जात आहे.

जम्मू-काश्मीरमधील अनंतनाग जिल्ह्यातील पहलगाम येथे पर्यटकांवर दहशतवादी हल्ला झाला आहे. या हल्ल्यात २० ते २५ पर्यटक ठार झाले आहेत. हा हल्ला जम्मूच्य पहलगाम जिल्ह्यातील बैसरण परिसरात झाल्याची माहिति आहे. जम्मू-काश्मीर पोलीस आणि भारतीय लष्कर घटनास्थळी दाखल झाले असून, परिसराची नाकाबंदी करून तपास सुरू आहे. जखमींना जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. हल्लेखोरांनी पर्यटकांवर गोळीबार केला. हल्लेखोर मोटारसायकलवरून आले असावेत, अशी शक्यता वर्तवली जात आहे, परंतु याबाबत नेमकी माहिती मिळालेली नाही.






## केंद्रीय मंत्री व आमदारांच्या होम पिचवर












# शासकीय योजना ठरत आहेत भ्रष्टाचाराचे कुरण

## जल जीवन मिशनसह अनेक योजनांमध्ये गैरप्रकार

**दैनिक आपला विदर्भ**

**मेहकर : नागरिकांना सोयीसुविधा उपलब्ध व्हाव्यात, त्यांचे जीवनमान उंचवावे, यासाठी शासनाच्या वतीने जल जीवन मिशन योजना यासह अनेक योजना अंतर्गत तालुक्यात विविध विकास कामे केली जात आहेत. मात्र, सदर योजना ह्या दिलेल्या मुदतीत पूर्ण न करता व काही योजना ह्या केवळ कागदोपत्री पूर्ण करून शासकीय निधी हडप केल्या जात असल्याचा प्रकार अनेक योजनेच्या झालेल्या तक्रारी मधून आरोप केल्या गेले आहेत. विशेष म्हणजे मेहकर तालुका हा केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव व उच्च विद्याविभूषित तथा मंत्रालयीन सहसचिव पदावर दीर्घकाळ सेवा देणारे आमदार सिद्धार्थ खरात यांचे होम पिच आहे. तरीही एकही योजना पूर्णत्वास न जाता केवळ कागदोपत्री निधी लाटण्याचे काम सुरू असल्याने शासकीय योजना ह्या अधिकारी व काही पदाधिकाऱ्यांसाठी भ्रष्टाचारांचे कुरण ठरत आहेत.**

तालुक्यामध्ये सुरू असलेल्या विविध योजना तसेच चालू असलेल्या कामात बऱ्याच ठिकाणी अनियमितता आढळून येत आहे.त्यावर उच्च स्तरीय समिती गठीत करून विभागीय स्तरावर सदर प्रकरणाची चौकशी करून दोषीवर कारवाई करण्यात यावी, तसेच इतर कामाची सुद्धा चौकशी करावी अशी, अशा तक्रारीही अनेकांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे केल्या आहेत. मेहकर नगर परिषदतंर्गत सद्या पैनगंगा नदीवरील भिंतीचे काम तसेच इतर ९ कामे चालू आहेत. या कामाने तर, हद्द केली आहे. पैनगंगा नदीवरील भिंतीच्या कामाचे अंदाज पत्रक १२ ते १३ कोटी रुपयांचे तयार करण्यात आले आहे. आणि या अंदाजपत्रकाला वरिष्ठ अधिकाऱ्यांनी हे मंजुरा दिली आहे.त्यामुळे तालुक्यामध्ये किती अनागोंदी कारभार सुरू आहे याची प्रचिती यावरून झाली आहे. संरक्षण भीतीच्या कामाचे अंदाजपत्रक हे तब्बल १३ कोटी रुपये असल्याने सदर कामे सोन्या चांदीच्या मूल्यवान धातूद्वारे करण्यात येणार आहेत की, काय? असा उपरोधिक प्रश्न सर्वसामान्य नागरिक उपस्थित करीत आहे. त्याचबरोबर काम करणारी कंपनी ही इंटरनॅशनल आहे की, काय? असा प्रश्नही उपस्थित करीत नागरिक सदर कामाबाबत आश्चर्य व्यक्त करीत आहेत. भिंतीच्या कामाचे एवढे मोठे अंदाजपत्रक विदर्भात कोठेही आढळून येत नाही.सदर अंदाज पत्रक चाईना कंपनीचे आहे. की, साउथ कोरिया कंपनीचे आहे.



**देविदास खनपटे**
**मुख्य संपादक**

असा प्रश्नही उपस्थित होत आहे. विशेष म्हणजे चालू असलेल्या भिंतीचे कामाची मागणी मागील ७५ ते १०० वर्षात कधी झाली नाही, प्रशासकीय काळातच लोकल बॉडी नसताना सदर भिंतीचे बांधकामाला कोणाच्या आशीर्वादाने मंजुरी देण्यात आली. याबाबत सुद्धा प्रश्न उपस्थित होत आहे. तसेच २९ ऑक्टोबर २०२४ च्या आदेशाची अंमलबजावणी आजपर्यंत झालेली नाही. त्यामुळे सदर मनमानी कारभार कोणाच्या आशीर्वादाने सुरू आहे.असा प्रश्नही उपस्थित होत आहे. विशेष म्हणजे केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव आणि मंत्रालय




सहसचिव पदावर दीर्घकाळ सेवा देणारे आमदार सिद्धार्थ खरात यांचा मेहकर तालुका हा होम ग्राउंड आहे. त्यामुळे खासदार व आमदार यांनीतरी याकडे लक्ष देऊन अधिकाऱ्यांवर आपला वचक कायम ठेवावा, मनमानी कारभार करणाऱ्या अधिकाऱ्यांना लगाम लावावा,अशी अपेक्षा मतदार संघातील सुज्ञ मतदारांकडून व्यक्त केली जात आहे. अन्यथा पदाधिकाऱ्यांनी अधिकाऱ्यांच्या हातचे बाहुले न बनता जनतेच्या विकास कामांना प्राधान्यांना पूर्ण करण्यासाठी पाठपुरावा करावा, भ्रष्टाचार करणाऱ्यांना त्यांची जागा दाखववी. अशी अपेक्षा मतदार संघातील सुज्ञ व्यक्ती मतदारांकडून व्यक्त होत आहे.

## जल जीवनचे घबाड उघड लोकप्रतिनिधीचे तोंडावर बोट

तालुक्यात जल जीवन मिशन योजना ही गोरगरीब तथा महिलांसाठी अत्यंत महत्त्वाची योजना आहे. या योजनेमार्फत पिण्याच्या पाण्याची सुविधा होणार होती. मात्र, भ्रष्ट अधिकारी आणि अधिकाऱ्यांच्या हातचे बाहुले बनलेल्या पदाधिकाऱ्यांच्या आशीर्वादाने जल जीवन मिशन योजनेचा पूर्णतः बट्ट्याबोळ झाला आहे. असे असताना मतदारसंघातील केंद्रीय मंत्री व आमदार यांनी केवळ बघ्याची भूमिका घेत अधिकाऱ्यांसमोर हो- ला -हो बोलण्यापूर्तीच आपले काम केले आहे. तालुक्यात प्रचंड प्रमाणात गैरप्रकार झाल्यानंतर अधिकारी कर्मचाऱ्यांना धारेवर धरून सबक शिकवण्याची गरज असताना पदाधिकाऱ्यांनी केवळ तोंडावर बोट ठेवून बघ्याची भूमिका घेतल्याने अधिकाऱ्यांना रान मोकळे मिळत असल्याची चर्चा संपूर्ण मतदारसंघात होत आहे. पदाधिकाऱ्यांनी आपल्या पदाला शोभेला असा आपला वचक कायम ठेवावा, अशी अपेक्षा जनतेकडून व्यक्त केली जात आहे.

## जागतिक पुस्तक दिन

आज २३ एप्रिल, आजचा दिवस संपूर्ण जगात जागतिक पुस्तक दिन म्हणून साजरा केला जातो. विल्यम शेक्सपिअर, मिग्युअल सर्वांटीस, इंका गार्सीलोसो या जगातील ख्यातनाम व्यक्तींचा या दिवशी मृत्यू झाला त्यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी युनेस्कोने २३ एप्रिल हा दिवस जागतिक पुस्तक दिन म्हणून घोषित केला. हा दिवस पहिल्यांदा २३ एप्रिल १९२३ रोजी स्पेनमधील पुस्तक विक्रेत्यांनी साजरा केला. स्पेनमध्ये मिगेल डे सर्वांटीसच्या स्मरणार्थ हा दिवस साजरा करण्यात आला. त्यानंतर १९९५ मध्ये पॅरिसमध्ये युनिस्कोची सर्वसाधारण सभा झाली ज्यात जगभरातील लेखकांना आदर आणि श्रद्धांजली वाहण्यासाठी आणि पुस्तकांमध्ये रस निर्माण करण्यासाठी जागतिक पुस्तक दिन प्रत्येक वर्षी साजरा केला जाईल असा निर्णय घेण्यात आला. वाचन संस्कृतीच्या चर्चेविना पुस्तक दिन साजरा होऊच शकत नाही चला तर मग वाचन संस्कृती विषयी चर्चा करू आणि पुस्तक दिन साजरा करू. आजच्या मोबाईल, इंटरनेट, सोशल मीडियाच्या युगात विद्यार्थ्यांचे वाचन कमी होत चालले आहे. पूर्वी विद्यार्थ्यांमध्ये जशी वाचनाची आवड होती तशी आवड आजच्या विद्यार्थ्यांमध्ये दिसून येत नाही. आजच्या सोशल मीडिया आणि इंटरनेटच्या युगात पुस्तके वाचण्याचे प्रमाण दिवसेंदिवस कमी होत चालले आहे. विद्यार्थ्यांमध्ये अवांतर वाचनाची गोडी कमी होत चालली आहे. साहित्य संमेलनामध्ये पुस्तकांची विक्री कमी होऊ लागली आहे. पूर्वी गजबजणारी वाचनालये आता ओस पडू लागली आहेत. ग्रंथालयातील पुस्तके वर्षानुवर्षे एका जागेवरून हलत नाही. आजची पिढी सोशल मीडियाच्या आहारी गेल्याने पुस्तकांपासून दूर होत चालली आहे. सोशल मीडियाच्या आक्रमणामुळे विद्यार्थी अवांतर वाचन विसरत चालले आहेत. सोशल मीडियामुळे वाचन संस्कृती लोप पावत चालली आहे. वाचन संस्कृती टिकवण्यासाठी तसेच विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण करण्यासाठी पुस्तक दिनासारख्या उपक्रमांचे आयोजन व्हायला हवे. आजच्या युगात ज्ञान ही खूप मोठी शक्ती आहे याचाच आपल्याला विसर पडला आहे. वाचनामुळे आपल्याला इतिहासाचे ज्ञान, वर्तमानाचे भान आणि भविष्याचा वेध घेता येतो. ज्ञान मिळवण्याचे प्रभावी साधन म्हणजे वाचन. सातत्याने वाचन केल्यावर आपली ग्रहण क्षमता आणि स्मरणशक्ती अधिकाधीक सशक्त होऊन बुद्धिमत्ता अधिकाधीक प्रगल्भ होते त्यातून माणसाच्या विचार पातळीचा चोहोबाजूंनी विकास होतो. वाचनामुळेच माणसाच्या व्यक्तिमत्वाची जडणघडण होते. वाचनामुळे माणूस सुसंस्कृत होतो. चांगलं वाचल्यावर आणि चांगलं ऐकल्यावर आपले विचार विवेकशील व प्रगल्भ होतात, त्यातून आपली मनोभावना शुद्ध होते. आपली भाषा तसेच वक्तृत्व विकसित होते. वाचनामुळे आपले व्यक्तिमत्व बहरते. वाचन ही जीवनाला उन्नत करणारी बाब आहे यामुळे बुद्धीची मशागत होते. माणसाचे जीवन फुलवण्यात वाचनाचा मोठा वाटा असतो त्यामुळे वाचनाचा छंद जोपासून आपले जीवन समृद्ध करायला हवे. मनावरचा ताण कमी करण्यासाठी पुस्तकांच्या सहवासात रमले पाहिजे. चांगल्या पुस्तकांचा, विचारांचा आपल्या जीवनावर सकारात्मक परिणाम होतो आणि आयुष्याकडे पाहण्याचा आपला दृष्टिकोन कायमचा बदलून जातो. पुस्तकांमुळे कमकुवत मनाला धीर मिळतो त्यामुळे निराशेच्या गर्तेत अडकलेला माणूस हत्या, आत्महत्या करण्यापासून परावृत्त होतो. आजकालच्या तरुणांना खूप ताण असतो हा ताण कमी करण्याचे प्रभावी माध्यम म्हणजे वाचन. डॉ बाबासाहेब आंबेडकर नेहमी म्हणत पुस्तकाने अशक्त मस्तक सशक्त होते आणि सशक्त मस्तक कोणासमोरही डोळे झाकून नतमस्तक होत नसते. स्वामी विवेकानंद, महात्मा फुले, डॉ बाबासाहेब आंबेडकर, भगतसिंग यासारख्या महापुरुषांच्या जीवनाला वाचनामुळेच कलाटणी मिळाली. ऐतिहासिक पुस्तकांमुळे वाचकांच्या मनात राष्ट्रनिष्ठा निर्माण होते. कथा कादंबरी यामुळे वाचकांच्या मनात माणुसकीचा भाव जागृत होतो. काव्य वाचनातून आपल्या मनात संवेदनशीलता निर्माण होते. थोरांची चरित्रे वाचून प्रेरणा मिळते. वर्तमानपत्र वाचल्याने सामाजिक जाणिव निर्माण होते. एकूणच वाचनामुळे माणूस सर्वगुणसंपन्न होतो. त्यांच्यात नैतिक मूल्यांची रुजवण होते. आज वाचनाअभावी समाजातून नैतिक मूल्ये हरवत चालली आहे. त्यामुळे नव्या पिढीने पुन्हा एकदा वाचन संस्कृतीकडे वळणे ही काळाची गरज आहे. आपल्या आणि समाजाच्या भल्यासाठी वाचन संस्कृती टिकवायलाच हवी. वाचाल तर वाचाल या उक्तीप्रमाणे तरुण पिढीला वाचवायचे असेल तर त्यांच्यात वाचन संस्कृती रुजवायलाच हवे, त्यासाठी पुस्तक दिनासारखे उपक्रम नक्कीच फायदेशीर ठरतील.

# समृद्धी महामार्गावरील अपघातात एक जागीच ठार

## डोणगाव पेट्रोल पंपा समोरील घटना



**दैनिक आपला विदर्भ**

**■ देवानंद सानप**

**डोणगाव :** पिण्याच्या पाण्यासाठी बॅरल भरून आणताना कारणे जबर धडक दिल्याने एकाचा जागीच मृत्यू झाल्याची घटना समृद्धी महामार्गावरील डोणगाव पेट्रोल पंपा समोर २१ एप्रिल रोजी सायंकाळी ४.४० वा दरम्यान समृद्धी महामार्गावरील डोणगाव पेट्रोल पंपा समोर घडली.

महामार्गाच्या मधोमध झाडे लावण्याचे काम सुरू आहे. अगोदर लावलेल्या झाडांना पाणी देण्यासाठी सदर महामार्गावर बहुतेक ठिकाणी ठिबक सिंचन करून पाणी देण्यात येत आहे.

त्याकरिता समृद्धी महामार्गावरील डोणगाव अग्रवाल पेट्रोल पंपा समोरील चैनल नंबर २६८ नागपूर कॅरिडोर जवळ काही कामगार हे काम करीत होते. त्यापैकी दोन कामगारांना तहान लागल्याने त्यांनी बॅरियर वरून महामार्गावर प्रवेश करताच आजुबाजुला न बघता महामार्ग ओलांडत असताना भरधाव येणाऱ्या एम.एच.१४ जेएच ७७६३ चे चालक निखिल राठोड यांनी समोर महामार्ग ओलांडत असलेल्या व्यक्तीला वाचवण्याच्या प्रयत्नात कारवरील नियंत्रण सुटल्याने घडलेल्या अपघातात कामगार आशिष आदिवासी वय २१ या. कुंमरी, जिल्हा आमरोह ( मध्यप्रदेश) याला जोरदार धडक दिली. यामध्ये त्याचा जागेवरच मृत्यू झाला व दुसरा कामगार ज्ञानेश्वर बोरसे हा किरकोळ जखमी झाला.घटनेची माहिती मिळताच तात्काळ समृद्धी महामार्गावरील १०८ ॲम्बुलन्स चे डॉक्टर पिसे, चालक पडघान यांनी घटनास्थळी दाखल होत जखमींवर प्राथमिक उपचार केले व सदर मृतक या तपासण्यांती मृत घोषित केले. व क्यूआरव्ही टीम मेहकरचे सचिन हुडेकर, दीपक काळे, अमोल मोडगरे यांनी मृतक व जखमी यांनी सहकार्य केले. तसेच महामार्ग पोलीस चे पोलीस उपनिरीक्षक जितेंद्र राऊत ,पोलीस हेडकॉन्स्टेबल विठ्ठल काळुसे ,नजीर शेख यांनी सदर अपघात करून गेलेली कार ही पळून गेल्याने अमानी महामार्ग पोलीस मदत केंद्र यांच्याशी संपर्क साधून त्यांना अपघाताबद्दल माहिती दिल्याने तात्काळ समृद्धी मालेगाव एक्झिट पॉईंट वर पकडल्या गेली. सदर अपघाताची माहिती पोलीस स्टेशन डोंगराचे ठाणेदार अमर नागरे ,पीएसआय सावले, पोलीस कर्मचारी राम अत्तरकर, वाळले यांनी सदर अपघातग्रस्त कार मालेगाव टोल नाका येथून परत आणून पुढील कारवाई कामी पोस्टे डोणगाव येथे घेऊन गेले. सदर घटनेचा पुढील तपास पोस्टे डोणगाव करीत आहे.समृद्धी महामार्गावर काम करीत असताना कामगाराच्या सुरक्षे करिता सुरक्षित अंतरावर सेफ्टीकोन किंवा बॅरिकेट्स, व कामगाराच्या अंगामध्ये रिप्लेटर जॅकेट लावले असते तर अपघात नक्कीच टाळता आला. असे बोलले जात आहे.

# रिसोड तालुक्यात ग्रामपंचायत सरपंच पदाचे आरक्षण जाहीर

# ८० पैकी ३९ ठिकाणी महिलाराज





**दैनिक आपला विदर्भ**

**रिसाडे/प्रतिनिधी :** तालुक्यातील सन २०२५ ते २०३० दरम्यान सार्वत्रिक निवडणूक द्वारे गठीत होणाऱ्या ग्रामपंचायत सरपंच पदाकरीता आरक्षण सोडत २१ एप्रिल रोजी काढण्यात आली. रिसोड तहसीलच्या सभागृहात सकाळी ११ वाजता उपविभागीय अधिकारी वैशाली देवकर, तहसीलदार प्रतीक्षा तेजनकर, निवडणूक नायब तहसीलदार गजानन जवादे यांच्या उपस्थितीत ही आरक्षण सोडत काढून ग्राम पंचायत निहाय आरक्षण जाहीर करण्यात आले. ग्रामपंचायत निवडणुकीला स्थानिक पातळीवर महत्त्व असल्याने सन २०२५ ते २०३० मध्ये होणाऱ्या सार्वत्रिक ग्रामपंचायत निवडणूका लक्षात घेता भुवनेश्वर एस जिल्हाधिकारी वाशिम यांच्या आदेशानुसार ग्रामपंचायत सरपंच पदाकरिता ही आरक्षण सोडत काढण्यात आली. गाव पातळीवरील ग्रामपंचायत सरपंच पद हे अतिशय महत्त्वाचे असल्याने या आरक्षण सोडतीकडे रिसोड तालुक्यातील गाव पातळीवरील राजकीय नागरिकांचे लक्ष लागलै होते रिसोड तालुका सन २०२५ – ३० करिता ग्रामपंचायत नुसार सरपंच पदाचे आरक्षण यामध्ये अनुसूचित जाती दापुरी खुर्द, किनखेडा ,घोटा ,महागाव ,हराळ, चिखली, चाकोली, हिवरापेन, आसेगाव पेन ,लोणी बु अनुसूचित जाती स्त्री करिता जोगेश्वरी, पेनबोरी, मोप, लोणी खुर्द, वडजी ,गौंढाळा ,पिंपरी सरहद ,सवड, नावली, अनुसूचित जमाती करीता कोयाळी खुर्द, वाकद, अनुसूचित जमाती स्त्री करीता मसलापेन, धोडप बु, नागरिकांचा मागास प्रवर्ग व्याड ,शोलू खडसे ,नंधाना, रिठद, धोडप खुर्द ,खडकी सदार ,कंकरवाडी, करंजी, लेहनी, नागरिकांचा मागास प्रवर्ग स्त्री कोयाळी बुद्रुक, मोहजाबंदी ,पळसखेड, बोरखेडी ,वाडी रायाताळ, चिंचाबाभर ,देगाव ,सर्वसाधारण पार्टी तिखे ,कळमगव्हाण, गणेशपुर ,भर जहागीर ,मोठेगाव, देऊळगाव बंडा, मांगुळझनक, जांबआढाव ,मोहजा इंगोले, कवठा खुर्द ,केनवड, करडा, अंचळ, निजामपूर ,अगरवडी, मांडवा ,बाळखेड, पिंपरखेड, बीबखेडा ,मोरगव्हाण, सर्वसाधारण स्त्री गोहगाव, वनोजा, लिंगाकोतवाल ,बेलखेड, शेलगाव राजगुरे ,गोवर्धन, येवता, चिंचाबापेन ,गोभणी, भापूर, नेतंसा ,एकलसपुर, केशवनगर, कुकसा ,वाघी खु,जवळा, कु–हा, मंगवाडी, येवती ,घोंणसरवाडी, या गावांचा समावेश आहे तालुक्यात ८० ग्रामपचायती पैकी ३९ ग्राम पंचायतीत महिला आरक्षण निघाल्याने रिसोड तालुक्यातील ओबीसी महिला आरक्षण कमी दिसत आहे . सोमवार २१ एप्रिल रोजी सकाळी अकरा वाजता रिसोड तहसीलच्या सभागृहात मंजिरी सारसकर वय १० वर्ष या मुलाच्या हस्ते ईश्वर चिठ्ठीद्वारे हे आरक्षण काढण्यात आले. यावेळी कारंजा तालुक्यातील गावा गावातील गाव पातळीवरील राजकारणी मंडळी उपस्थित होती. रिसोड तालुक्यातील ८० ग्रामपंचायत पैकी ३९ ठिकाणी महिला आरक्षण जाहीर झाले आहे.

## टायगर श्रॉफला मारण्याची सुपारी? पोलिस तपासात खळबळजनक खुलासा समोर

**मुंबई/प्रतिनिधी :** अभिनेता सलमान खाननंतर आता बॉलिवूडमधील आणखी एका सुपरस्टारच्या मुलाला जिवे मारण्याची धमकी मिळाल्याने खळबळ उडाली आहे. अभिनेता जॅकी श्रॉफ यांचा मुलगा आणि लोकप्रिय कलाकार टायगर श्रॉफ याला मारण्यासाठी २ लाख रुपयांची सुपारी देण्यात आली असल्याची माहिती सोमवारी पोलिसांना मिळाली होती. मात्र, तपासात ही माहिती खोटी असल्याचे निष्पन्न झाले आहे.

मुंबई पोलिसांच्या नियंत्रण कक्षाला आलेल्या फोननंतर तातडीने सुरक्षा यंत्रणा सक्रिय करण्यात आली. आरोपीने सांगितले की, एका खासगी सुरक्षा कंपनीच्या लोकांना टायगर श्रॉफला मारण्यासाठी शस्त्र देण्यात आले असून, त्यासाठी दोन लाख रुपयेही दिले गेले आहेत. पण पोलिसांनी सखोल तपास केल्यानंतर या संपूर्ण माहितीमध्ये कोणताही तथ्याधार नसल्याचे स्पष्ट झाले.

मनीषकुमार सुजींदर सिंग (वय ३५) असं धमकी देणाऱ्या आरोपीचं नाव असून, तो मूळचा पंजाब राज्यातील आहे. या प्रकरणी खार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपीने मुंबई पोलिस नियंत्रण कक्षाला फोन करून खोट्या धमक्या दिल्या आणि गोंधळ निर्माण केला.

या प्रकारामुळे बॉलिवूडमध्ये चिंतेचं वातावरण पसरलं आहे. विशेषतः सलमान खानवर झालेल्या गोळीबारानंतर आता टायगर श्रॉफवर अशा प्रकारे खोटा कट रचल्याच्या बातमीमुळे संपूर्ण इंडस्ट्रीमध्ये खळबळ माजली आहे. सध्या पोलिसांकडून आरोपीची चौकशी सुरू आहे.

# पाणीटंचाई भागात १५ जुलै पर्यंत पाणीपुरी असे नियोजन करा

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे निर्देश : दूरदृश्य प्रणालीद्वारे घेतला आढावा

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** ग्रामीण किंवा शहरी भागात लोकांना पिण्याच्या पाण्यासाठी वणवण करावी लागू नये. उन्हाळा तीव्र आहे. त्यामुळे पुढील दोन महिने पिण्याचे पाणी जपून वापरा, असे निर्देश उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले. तसेच जिल्हा प्रशासन, जिल्हा परिषदा आणि मुख्याधिकारी यांना प्रत्यक्ष फिल्डवर भेटी देऊन पाण्याची सद्यस्थिती जाणून घेण्याच्या व टंचाई असलेल्या भागात तत्काळ उपाययोजना करण्याचे व १५ जुलैपर्यंत पाणीसाठा पुरेल असे नियोजन करावे असे निर्देश दिले.





उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी राज्यातील सर्व विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, मुख्याधिकारी यांच्याशी दूरदृश्य प्रणालीद्वारे २२ एप्रिल रोजी आयोजित बैठकीत प्रशासनाने डोळ्यात तेल घालून पाणीटंचाईला तोंड देण्याच्या आणि नियोजनबद्ध पद्धतीने पावले टाकून काम करण्याच्या सूचना दिल्या. यावेळी त्यांनी प्रत्येक जिल्ह्यात किती टँकर सुरु आहेत आणि गेल्या वर्षी काय परिस्थिती होती, याचाही आढावा घेतला. बैठकीस पाणीपुरवठा मंत्री गुलाबराव पाटील, राज्यमंत्री मेघना बोर्डीकर, उपमुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव नवीन सोना, ग्रामविकास प्रधान सचिव एकनाथ डवले, नगरविकास प्रधान सचिव डॉ. गोविंदराज, पाणीपुरवठा प्रधान सचिव संजय खंदारे यांची उपस्थिती होती.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## संक्षिप्त...

### कल्याणमध्ये दुचाकी चोरट्यास कोळसेवाडी पोलिसांनी केली अटक




दैनिक आपला विदर्भ

**कल्याण/प्रतिनिधी :** कल्याण पूर्वेतील मलंग ढाब्याच्या येथे उभी असलेली दुचाकी चोरी करणाऱ्या चोरट्यास कोळसेवाडी पोलिसांनी अटक केली आहे. अटक करण्यात आलेल्या चोरट्याचे नाव हेमंत रामकुशल यादव असे आहे. त्याने चोरी केलेली दुचाकी पोलिसांनी हस्तगत केली आहे. या चोरट्याने यापूर्वीही काही दुचाकी चोरी केल्या आहेत का? याचा तपास कोळसेवाडी पोलिस करीत आहेत.

### प्रसिध्द उद्योगपती आकाश अंबानी यांनी श्री साईचरणी लीन





दैनिक आपला विदर्भ

**शिर्डी/प्रतिनिधी :** रिलायन्स जियो इन्फोकॉम लिमिटेडचे अध्यक्ष प्रसिध्द उद्योगपती आकाश अंबानी यांनी आज श्री साईबाबांच्या समाधीचे दर्शन घेतले आहे. दर्शनानंतर श्री साईबाबा संस्थानच्या वतीने मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर भा.प्र.से. यांनी त्यांचा सत्कार केला. यावेळी प्रशासकिय अधिकारी संदिपकुमार भोसले, जनसंपर्क अधिकारी तुषार शेळके, संरक्षण अधिकारी रोहिदास माळी आदी उपस्थित होते.

### इगतपुरी पूर्व भागात भीषण पाणी टंचाई





दैनिक आपला विदर्भ

**नाशिक/प्रतिनिधी :** इगतपुरी पूर्व भागात भीषण पाणी टंचाई निर्माण झाली असून तेथील महिलांना पाण्यासाठी वनवन भटकंती करण्याची वेळ आली आहे. खडकेद इंदोरे येथेही पाणी टंचाई निर्माण झाली आहे. गावातील विहीर व हाफशी आटल्याने दोन कि.मी ची पायपीट करत टेकडी उतरून महिलांना पाणी भरावे लागत आहे. स्मशानभूमी जवळील असलेल्या हापश्यावरून महिला व मुली पाणी भरत आहेत. या हापश्याचे पाणीही आटले असून, एक हंडा भरण्यास जवळजवळ वीस ते पंचवीस मिनिटे लागतात. पाणी हाफसून हाफसून महिलांचा जीव मेटाकुटीला आला आहे. हापश्याला पाणी नसल्याने व बारीक धार येत असल्याने अर्धा हंडा भरल्यावर हापश्याचे पाणी बंद होते, व काही वेळ थांबल्यावर परत चालू होते, अशी स्थिती निर्माण झाली आहे. विद्यार्थिनीला शाळेचे शिक्षण बुडवून व महिलांना रोजगार बुडून पाणी भरावे लागत आहे.आजुबाजुला डोंगर व जंगलाचा परिसर असल्याने वाटते जंगली श्वापदे यांची भीती निर्माण झाली असून महिलांना जीव धोक्यात घालून पाणी भरावे लागत आहे. याकडे प्रशासनाने लक्ष देऊन येथील पाणी टंचाई निवारण करावे, अशी मागणी स्थानिक महिला गुणवंता लोते यांनी केली आहे.

# खामगाव उप प्रादेशिक परिवहन येथे दुचाकी, चारचाकी वाहनासाठी नविन मालिका सुरु

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** खामगाव उप प्रादेशिक परिवहन कार्यालयात दुचाकी व चारचाकी वाहनांसाठी आकर्षक अथवा पसंतीचा नोंदणी क्रमांक घ्यावयाचा आहे अशा वाहनधारकांनी २४ एप्रिल, २०२५ पर्यंत अर्ज सादर करावे, असे आवाहन उप प्रादेशिक परिवहन अधिकारी यांनी केले आहे.

नवनिर्मीत उप प्रादेशिक परिवहन कार्यालय खामगांव MH-56 येथे दुचाकी, चारचाकी, ऑटोरिक्षा, हलके मालवाहू व जडवाहन या वाहनासांठी नविन मालिका सुरु करण्यात येत आहे. यासाठी ज्यांना या वाहनांकरीता नियमीत विहीत शुल्क भरुन तसेच तीनपट शुल्क भरुन आकर्षक/पसंती क्रमांक राखीव करावयाचे आहेत त्यांनी दिनांक २४ एप्रिल रोजी कार्यालयीन वेळेत सकाळी १०.३० ते २.३० या दरम्यान पसंतीचे क्रमांकांच्या विहीत नमुन्यातील अर्जासह आधार कार्ड, रहिवाशी पत्ता पुरावा, पॅनकार्ड या कागदपत्राच्या साक्षांकीत प्रती बंद लिफाफयात कार्यालयाच्या रोख विभागात जमा कराव्यात. सदर लिफाफयावर वाहन मालकाचे नांव, वाहन वर्ग, पसंती क्रमांक व आधार लिंक मोबाईल क्रमांक लिहीलेला असावा. एका नंबर करीता एकापेक्षा जास्त अर्ज आल्यास त्याची यादी कार्यालयीन नोटीस बोर्डवर लावण्यात येईल. लिलावाचे डी.डी. दि.२४ एप्रिल २०२५ रोजी दुपारी २.३० वाजेपर्यंत स्वीकारले जातील. सदर अर्जासाठी त्याच दिवशी दुपारी ४.०० वाजता उप प्रादेशिक परिवहन अधिकारी यांचे दालनात लिलाव करण्यात येईल. पसंती क्रमांकाकरीता महाराष्ट्र शासन अधिसुचना दि. ३० ऑगस्ट २०२४ नुसार विहित करण्यात आलेले सुधारीत शुल्क लागू राहील.

सदर डी.डी. उप प्रादेशिक परिवहन अधिकारी खामगांव या नावाने राष्ट्रीयकृत/शेडयुल्ड बँकेचा असावा तसेच तो दोन महिण्यापेक्षा जास्त नसावा. अन्य नावे असलेला डी.डी. स्विकारला जाणार नाही. त्यासोबत अर्जदारास पॅनकार्डची साक्षांकीत प्रत जोडणे अनिवार्य राहील. लिलावाकरीता आकर्षक / पसंती क्रमांकासाठी मुळ विहीत शुल्काचा एक डी.डी. व लिलावसंदर्भात जादा रकमेचा दुसरा डी.डी. असे दोन डी.डी. आवश्यक राहतील. लिलावाच्या डी.डी. चे फक्त एकच पाकीट ग्राहय धरले जाईल. एकाच अर्जदाराने एकाच क्रमांकाकरीता एकापेक्ष जास्त लिफाफ टाकल्याचे आढळून आल्यास असा अर्ज रद्द समजण्यात येईल.

लिलाव प्रक्रियेत एखाद्या पसंती क्रमांकाला समान रक्कमेचे डी.डी. प्राप्त झाल्यास असा क्रमांक अर्जदारांच्या नावाच्या चिठ्ठया टाकून निश्चीत करण्यात येईल. सदर निर्णय सर्वांना लागू राहील. लिलाव सुरु असतांना समोर अर्जदार उपस्थित असो अथवा नसो संपूर्ण लिलाव प्रक्रिया ही पूर्ण करण्यात येईल.

पसंती क्रमांकाच्या आगाऊ नोंदणीकरीता उप प्रादेशिक प्रादेशिक परिवहन कार्यालय खामगांव च्या कार्यक्षेत्रातील पत्ता असलेल्या वाहनधारकांनीच अर्ज सादर करावेत. कार्यक्षेत्राबाहेरील तसेच चुकीच्या रकमेचा जोडलेला डी.डी. चुकीचा वाहन वर्ग तसेच अचूक/आधार लिंक मोबाईल क्रमांक न लिहीलेले अर्ज बाद ठरविण्यात येतील.

वाहन मालकास पसंतीच्या नोंदणी क्रमांकाची विहीत शुल्क अदा करुन नोंदणी क्रमांक राखुन ठेवता येतो. महाराष्ट्र मोटार वाहन नियम १९८९ च्या नियम ५४ अ नुसार राखून ठेवलेल्या पसंतीच्या नोंदणी क्रमांकाची वैधता ही १८० दिवस असून नोंदणी क्रमांक राखून ठेवल्याच्या दिनांकापासून १८० दिवसाच्या आत वाहन नोंदणीची प्रक्रीया पुर्ण झाली नसल्यास पसंती क्रमांकाची वैधता संपुष्टात येते. त्यानंतर वैधता संपलेले पसंती क्रमांक पसंती क्रमांकाच्या पोर्टलवर उपलब्ध होऊन इतरांना ते राखीव करता येतील.

सदर लिलावानंतर नविन मालिकेतील उर्वरीत आकर्षक/ पसंती क्रमांक जनतेला सीटीझन पोर्टलवर विहीत शुल्क भरुन राखीव करता येतील. उपरोक्त कालावधीमध्ये व पुढे त्यावेळी अस्तीत्वात असलेले शुल्क लागु राहील याची नोंद घ्यावी. असे प्रभारी उप प्रादेशिक परिवहन अधिकारी हेमंत खराबे यांनी कळविले आहे.

## मलकापूर तालुक्यातील शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी प्रहारचा मोर्चा

दैनिक आपला विदर्भ

बुलढाणा : जिल्ह्यामधील मलकापूर तालुक्यातील शेतकर्यांच्या खात्यात खरीप २०२३ चा मंजूर पिक विमा तात्काळ जमा करण्यात यावा, यासह शेतकर्यांच्या विविध समस्यांकडे शासन, प्रशासन दुर्लक्ष करीत असल्याने २२ एप्रिल रोजी प्रहार जनशक्ती पक्षाचे जिल्हा उपप्रमुख अजय टप यांच्या नेतृत्वात तालुका कृषी अधिकारी कार्यालयावर बैलगाड्यासह मोर्चा काढण्यात आला. यावेळी विविध मागण्यांचे निवेदन तहसीलदार यांना देण्यात आले.




प्राप्त माहितीनुसार मलकापूर तालुक्यातील शेतकर्यां नी ऑनलाईन पध्दतीने शेतातील पिकांचा पीक विमा काढलेला होता. तर, तालुक्यामध्ये मोठ्या प्रमाणात वादळी वार्या सह अतिवृष्टी व पुराचा फटका बसला होता. त्यामुळे शेतकर्यांकच्या शेतातील पिकांची नासाडी व शेती खरडून गेली होती. त्यानंतर ही बाब शासन, प्रशासनाच्या निदर्शनात आणून दिल्यानंतर नुकसानग्रस्त शेतकर्यांच्या शेताचे पंचनामे करण्यात आले होते. तर शेतकर्यां ना पिकविमा मंजूर करण्यात आला होता, मात्र, बर्याच शेतकर्योंना २०२३ चा पिकविमा अद्यापही मिळालेला नाही. याबाबत अनेकदा कृषी विभागाकडे मागणी करण्यात आली.

मात्र, वेळोवेळी उडवाउडवीची उत्तरे देण्यात येत होती. एकीकडे शेतकर्यां ना आशा दाखविली जाते, तर दुसरीकडे त्यांच्या नुकसानीचा लाभ त्यांना देण्यात येत नसल्याने प्रहार जनशक्ती पक्षाच्या वतीने शासनाचे लक्ष वेधण्यासाठी व प्रशासनाला जागे करण्यासाठी बैलगाड्यांसह शेतकर्यांना सोबत घेत तालुका कृषी अधिकारी कार्यालयावर धडक देत कृषी अधिकार्यांना धारेवर धरीत तात्काळ पीक विम्याची रक्कम देण्यात यावी, अशी मागणी केली.

यावेळी संतप्त झालेल्या प्रहार जनशक्ती पक्षाच्या पदाधिकार्यां नी व शेतकर्यांनी कृषी कार्यालयात चांगलाच गदारोळ घातला. जोपर्यंत आम्हाला आमच्या नुकसानीचे व पीक विम्याचे पैसे मिळत नाही, तोपर्यंत आम्ही येथून जाणार नाही असा इशारा देत त्याठिकाणी ठिय्या आंदोलन सुरू केले. यानंतर नरमलेल्या तालुका कृषी अधिकार्यां नी शेतकर्योंचा मंजूर पीक विमा येत्या ७ दिवसाच्या आत त्यांच्या खात्यात जमा केला जाईल, असे आश्वासन दिल्याने तुर्त ठिय्या आंदोलन थांबवित शेतकर्यां नी कार्यालय सोडले. कृषी विभागाने पीक विमा न दिल्यास पुन्हा तीव्र आंदोलन करू, असा इशारा प्रहार संघटनेचे जिल्हा उपाध्यक्ष अजय टप व तालुकाध्यक्ष अमोल फुंदे यांनी यावेळी दिला.

### अक्षय्य तृतीयेच्या आधीच सोन्याने गाठला उच्चांक दर, प्रति तोळा सोनं १ लाखांवर

**बारामती/प्रतिनिधी :** अक्षय्य तृतीयेच्या आधीच सोन्याने उच्चांक दर गाठला आहे. आज सोन्याच्या दराने १ लाख रुपयांचा दर गाठला आहे. सोन्याबरोबरच चांदीच्या दरातही वाढ झाली आहे. आज चांदी ५२८ रुपये प्रति किलोने महागली असून ९५७७५ रुपयांवर ट्रेड करतेय. तर सराफा बाजारात सोनं एक लाख रुपये प्रति तोळा ट्रेड करत आहे. त्यामुळं आता ग्राहकांना मोठा झटका बसला आहे. डॉलरच्या घसरणीमुळं सोन्याच्या किंमती वधारल्या आहेत. सोन्याचे दर २०२५मध्ये आत्तापर्यंत ३० टक्क्यांपर्यंत उसळले आहेत.

## मंत्री नरहरी झिरवाळांनी लहानपणीच्या मित्राला दाखवले हेलिकॉप्टर




**नाशिक/प्रतिनिधी :** हेलिकॉप्टर जवळ घेऊन पायलट सोबत काढले फोटो मंत्रीनरहरीझिरवाळत्यांच्यामतदारसंघातीलवनारेयागावीहेलिकॉप्टर आले असता त्यांना पाहण्यासाठी गावकऱ्यांनी केली होती गर्दी यावेळी त्यांच्या लहानपणीचा मित्र कांतिलाल गवळी त्यांना भेटला असता काढला हेलिकॉप्टरसोबतफोटो

## पाणीटंचाई संदर्भात काळजी करण्याचे कारण नाही

### शरद पवार यांची पत्रकार परिषदेत माहिती

दैनिक आपला विदर्भ

**बारामती/प्रतिनिधी :** काळजी करण्याचे कारण नाही, या अगोदर देखील अशा पद्धतीने पाणीटंचाई झालेली होती. शेतकरी देखील पाण्याचा जपून वापर करतील. मे आणि जून महिना काढायचा आहे, यातून मार्ग काढत आपण बाहेर जाऊ.अशी माहिती राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरदचंद्र पवार यांनी माध्यमांशी बोलताना दिली. यावेळी ते म्हणाले की, तंत्रज्ञान देशभर राबवले जात आहे ही वस्तुस्थिती नाही. काल सकाळी समूहाचे प्रतापराव पवार यांनी कृषी मंत्री यांना तंत्रज्ञान देशभरामध्ये राबवावे,असे सांगितले आहे. त्याची सुरुवात आम्ही बारामती मधून केली आहे. हे तंत्रज्ञान अनेक गोष्टीसाठी उपयोगी आहे. आरोग्य फायनान्स इंजीनियरिंग परंतु,जास्त प्रमाणात इंटीयन्स हे कृषी क्षेत्रात आहे. याची आम्ही सुरुवात उसापासून केली आहे. राज्याच्या वतीने हे तंत्रज्ञानाच्या माध्यमातून अजून पाच पिके घेणार असल्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सांगितलेल आहे. याचा फायदा राज्यामध्ये होईल असे ते म्हणाले. तसेच पाणीटंचाई संदर्भात बोलताना म्हणाले की, काळजी करण्याचे कारण नाही, या अगोदर देखील अशा पद्धतीने पाणीटंचाई झालेली होती. शेतकरी देखील पाण्याचा जपून वापर करतील. मे आणि जून महिना काढायचा आहे, यातून मार्ग काढत आपण बाहेर जाऊ. राज उद्धव एकत्र येण्यासंदर्भात बोलताना म्हणाले की, हा त्यांचा कौटुंबिक प्रश्न आहे, याची मला माहिती नाही. मी याबाबत त्यांच्याशी बोललो नाही, त्यामुळे मी त्याच्यावर कसं बोलणार.असे मत व्यक्त केले. पवार कुटुंब एकत्र या संदर्भात बोलताना ते म्हणाले की, जनतेच्या कामा निमित्ताने एकत्र आलो होतो. सरकारच्या प्रतिनिधीशी बोलणे यामध्ये काही चुकीचे नाही.असे मत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरदचंद्र पवार यांनी व्यक्त केले.

## केस व नख गळती प्रकरण: केंद्रीय पथकाची बोंडगावात भेट व रुग्णांची तपासणी

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** जिल्ह्यातील बोंडगाव व इतर काही गावांमध्ये वाढत असलेल्या केस व नख गळतीच्या घटनांच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय पथकाने आज शेगाव तालुक्यातील बोंडगाव येथे भेट दिली. त्यांनी रुग्णांशी संवाद साधत त्यांच्या प्रकृतीविषयी माहिती घेतली आणि आवश्यक नमुने संकलित केले. यावेळी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. भागवत भुसारी, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अमोल गीते उपस्थित होते या पथकात, राष्ट्रीय रोग नियंत्रण विभाग, जल जीवन मिशन अंतर्गत पाणी गुणवत्ता विभाग, लेडी हार्डिंग मेडिकल कॉलेजचे त्वचारोग तज्ज्ञ, , भारतीय गहू व जव संशोधन केंद्र (हरियाणा), प्लांट क्वारंटाईन विभाग आणि कृषी मंत्रालयाचे तज्ज्ञ यांचा समावेश आहे.





बुलडाणा जिल्ह्यातील शेगाव व नांदुरा तालुक्यातील एकूण तेरा गावांमध्ये अशा रुग्णांची संख्या वाढत आहे. केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांच्या निर्देशानुसार हे तज्ज्ञ पथक जिल्ह्यात दाखल झाले असून, गावोगावी जाऊन रुग्ण आणि त्यांच्या कुटुंबीयांशी संवाद साधून आजाराच्या मूळ कारणाचा शोध घेत आहे.

ही कारवाई आजाराच्या स्रोताचा शोध घेऊन योग्य उपचार व प्रतिबंधात्मक उपाययोजना निश्चित करण्यात महत्त्वाची ठरणार आहे.

# केस व नख गळतीच्या आजारावर नियंत्रणासाठी केंद्रीय पथकाला निर्देश; केंद्रीय राज्यमंत्री जाधव

## – केस व नख गळती आजाराच्या संशोधनासाठी केंद्रीय पथक दाखल – केंद्रीय पथकाला सहकार्य करा

**दैनिक आपला विदर्भ**

**बुलडाणा/प्रतिनिधी :** जिल्ह्यातील काही गावांमध्ये केस गळतीचे आणि त्यानंतर नख गळतीचे प्रकार वाढत असल्याच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय आयुष आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी आज केंद्र सरकारच्या पथकाला या आजाराच्या मुळाशी जाऊन कार्य करण्याचे निर्देश दिले.

केस व नख गळतीच्या पश्वभूमीवर मेहकर येथे केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांच्या अध्यक्षतेखाली आढावा घेण्यात आला, त्याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी आयसीएमआर, राष्ट्रीय रोग नियंत्रण विभाग, जल जीवन मिशन अंतर्गत पाणी गुणवत्ता विभाग, लेडी हार्डिंग मेडिकल कॉलेज नवी दिल्लीचे डरमेटोलॉजी तज्ज्ञ, , भारतीय गहू व जव संशोधन केंद्र हरियाणा, प्लांट क्वारंटाईन विभाग आणि कृषी मंत्रालयाचे तज्ज्ञ तसेच जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. भागवत भुसारी, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अमोल गीते आदी उपस्थित होते



केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव म्हणाले, रुग्णांना पुन्हा त्रास होऊ नये यासाठी तातडीने प्रतिबंधात्मक औषधोपचार सुरू करण्याचे निर्देश दिले. तसेच या आजाराचे मूळ कारण शोधून त्यावर प्रभावी उपाययोजना करा. यासाठी रुग्णांचे रक्ताचे नमुने तसेच बाधित गावातील पाणी, माती, धान्य आदींचे नमुने संकलित करून प्रयोगशाळेत तपासणी करून अहवाल सादर करण्याचे सुचना दिल्या.





केंद्रीय पथक दोन दिवस बांधीत गावाला भेटी देणार असून रुग्णांशी भेटी घेऊन आजाराचे मूळ कारण शोधणार आहे. त्यामुळे नागरिकांनी केंद्रीय पथकाला सहकार्य करावे, असे आवाहन ना. प्रताप जाधव यांनी यावेळी केले.

बुलडाणा जिल्ह्यातील पहुरजिरा, कालवड, कठोरा, भोनगाव, बोंडगाव, शेगाव आणि नांदुरा तालुक्यातील एकूण तेरा गावांमध्ये रुग्णांची संख्या वाढत आहे. या प्रकरणाची केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांच्या निर्देशानुसार केंद्र आणि राज्य सरकारच्या नऊ विभागांचे तज्ज्ञ आज जिल्ह्यात दाखल झाले आहेत. तज्ज्ञांकडून आता गावागावात जाऊन रुग्ण व त्यांच्या कुटुंबीयांची भेट घेत प्रत्यक्ष माहिती संकलन केले जाईल. यावरूनच या आजाराचा खरा स्रोत आणि त्यावरील उपाय निश्चित केले जातील.

# बेलगावमध्ये अग्नीतांडव लाखो रुपयांचे नुकसान

## खाण्यापिण्याचे साहित्य जळून खाक : दोन्ही कुटुंबावर उपासमारीची वेळ





**दैनिक आपला विदर्भ**

**■ गजानन जाधव**

**मेहकर :** तालुक्यातील बेलगाव येथे लागलेल्या भीषण आगीत दोन घरे जळून लाखो रुपयांचे नुकसान झाल्याची घटना २१ एप्रिल रोजी रात्री बारा ते एक वाजताच्या दरम्यान घडली. सदर आगीमुळे दोन्ही कुटुंबावर उपासमारीची वेळ आली आहे.

प्राप्त माहितीनुसार तालुक्यातील बेलगाव येथील निवृत्ती इंगळे व विमलबाई डोंगरे यांचे घर टिनपत्राचे असल्यामुळे गरम होत असल्याने रात्री घराबाहेर झोपले होते. त्यामध्ये घरालगतच असलेले किराणा दुकान चे मालक सैदाभाई हे बारा एकच्या दरम्यान डोणगाववरून घरी आले असता त्यांना अचानक निवृत्ती इंगळे व विमलबाई यांच्या घराला आग लागलेली दिसली. त्यांनी आग पाहून आरडाओरडा केल्याने मोठा अनर्थ टळला. मात्र, सदर आगीत घरातील खायचे साहित्य व कपडे मौल्यवान वस्तू जळून खाक झाल्या. निवृत्ती इंगळे हे बेलगाव ग्रामपंचायत मध्ये रोजगार सेवक मधून काम पाहतात व त्यांच्या घरामध्ये अनेक मौल्यवान कागदपत्र आणि लोकांचे रोजगार हमीचे जॉब कार्ड आधार कार्ड होते. मात्र, सदर साहित्य आगीमध्ये जळून खाक झाले आहेत. तसेच इतर साहित्य जळून खाक झाल्याने लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे. तरी, शासनाने नुकसान भरपाई म्हणून तात्काळ आर्थिक मदत द्यावी, अशी निवृत्ती इंगळे यांनी केली आहे. तसेच त्यांच्या घरालगतच असलेले विठ्ठल निवृत्ती वानखेडे यांच्या घराला सुद्धा आग लागल्याने त्यांचे घरातील टिन पत्र व लाकडं जळाले मात्र यामध्ये काही जिवित हानि झाली नाही. गावांमध्ये तीव्र पाणीटंचाई असल्याने गावातील खाजगी टँकर चालू आहेत. टँकर भरेल असल्यामुळे हे आग आटोक्यात आणता आली. सदर नुकसानीचा तलाठी अरुण आळने यांनी पंचनामा केला आहे.तसेच गावाचे पोलीस पाटील नारायण वानखेडे, तंटामुक्ती अध्यक्ष यांनी सुद्धा घटनास्थळाला भेट देऊन पाहणी केली आहे.

# सर्व बेकायदेशीर मस्जिद वरील भोंगे हटणार भाजप नेते किरीट सोमय्या यांची माहिती

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** अनधिकृत भोंगे आणि मशिदीच्या विरोधात दाखल तक्रारीचा आढावा घेण्यासाठी भाजप नेते किरीट सोमय्या यांनी घाटकोपर चिराग नगर पोलीस ठाण्यात भाजप कार्यकर्त्यांसह दाखल होऊन याबाबत माहिती घेतली.तसेच सर्व बेकायदेशीर मस्जिद वरील भोंगे हटणार असल्याची माहिती माध्यमांशी बोलताना भाजप नेते किरीट सोमय्या यांनी दिली.

घाटकोपर चिराग नगर पोलीस ठाण्यात सर्व बेकायदेशीर मस्जिद वरील भोंगे हटविण्याची मागणी सोमय्या यांनी केली होती. अनधिकृत भोंगे आणि मशिदीबाबत पोलिसांनी कारवाईला सुरुवात केली आहे. आता घाटकोपर पश्चिम येथील मशिदीवरील अनधिकृत आणि मोठ्या आवाजाचे भोंगे बंद झालेले दिसणार असल्याचे सोमय्या यांनी सांगितले. भोंग्यांच्या जागी लाऊड स्पीकर बॉक्स असणार आहे. ध्वनिक्षेपक बॉक्स टाईप (दोन) पद्धतीचा असावा व त्याचा आकार जास्तीस जास्त १५ इंच बाय १० इंच इतका असावा. ध्वनिक्षेपक जास्तीस जास्त ३.५ वॅट क्षमतेचा असावा, ध्वनीप्रदूषण नियंत्रण नियम-२००० अन्वये आवाजाची पातळी खाली मर्यादेपेक्षा जास्त नसावी, न्यायालयाच्या सुचनांचे पालन न झाल्यास कायदेशीर कारवाई करून ध्वनिक्षेपक यंत्रणा कायमस्वरूपी जप्त करण्यात येईल याची नोंद घ्यावी, असे पोलिसांनी सांगितले आहे. सर्व बेकायदेशीर मस्जिद वरील भोंगे हटणार आहेत.अशी माहिती भाजप नेते किरीट सोमय्या यांनी दिली आहे.

# उन्हाळी मुगावर पिवळ्या मोझॅक चा प्रादुर्भाव



**दैनिक आपला विदर्भ**

**रिसाडे/प्रतिनिधी :** उन्हाळी मुगावर पिवळ्या मोझॅक चा प्रादुर्भाव झाल्यामुळे मुगाचे उन्हाळी पीक संकटात सापडले असून या रोगाचा प्रादुर्भाव वाढत असल्यामुळे शेतकऱ्यांची चिंता वाढली असून उत्पादनात मोठ्या प्रमाणात घट येण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

मागील काही वर्षापासून सिंचनाच्या सुविधेत वाढ झाल्यामुळे तसेच या पिकाचा खरिपा मध्ये शेतकऱ्यांना मोठा आधार मिळत असल्यामुळे उन्हाळी पिकांच्या पेऱ्यात वाढ झाली आहे तसेच दोन ते अडीच महिन्याच्या कालावधीत हे पीक हाती येत असल्यामुळे पाण्याची सुविधा असलेले शेतकरी उन्हाळी उडीद व मुग ही पिके घेत आहेत.

दरवर्षीच्या अनुभवावरून एकरी चार ते पाच क्विंटल पर्यंत या पिकाचा उतारा आहे परंतु यावर्षी उन्हाळी मुगावर पिवळ्या मोझॅक चा मोठ्या प्रमाणात प्रादुर्भाव झाला आहे एकूण एकूण क्षेत्राच्या जवळपास ७० ते ८० टक्के झाडांची पाने पिवळी पडली आहेत या रोगाचा प्रादुर्भाव झाल्यामुळे उत्पन्न मध्ये मोठी घट येण्याची शक्यता निर्माण झाली आहे महागडी औषधांची फवारणी करूनही मुळीच फरक पडला नसल्यामुळे शेतकऱ्यांना मोठा आर्थिक फटका बसला आहे कृषी विभाग ही याबाबतीत हतबल झाला आहे प्रादुर्भाव झालेली झाडे उपटून शेता बाहेर टाकण्याच्या सल्ला कृषी विभागाने दिला होता परंतु ७० ते ८० टक्के झाडावर प्रादुर्भाव झाल्यामुळे हे शक्य नसल्याचे शेतकरी सांगत आहेत.

मी दरवर्षी दोन एकर वर उन्हाळी मुगाची पेरणी करतो परंतु यावर्षी सोयाबीनला भाव मिळाला नसल्यामुळे ती कसर भरून काढण्यासाठी चार एकरावर उन्हाळी मुगाची पेरणी केली आहे परंतु सर्वच पिक पिवळे पडले आहे त्यामुळे केलेला सर्व खर्च व मेहनत वाया गेली आहे.

**–भुजंग सरकटे**
**शेतकरी मोहजा इंगोले**
**ता रिसोड.**

# लग्नाचे आमिष दखवून दोन लाखाची फसवणूक

## डोणगाव येडोणगाव येथील घटना : आरोपी महिलेचा पोबारा

**दैनिक आपला विदर्भ**

**डोणगाव/प्रतिनिधी :** लग्नाचे आमिष दाखवून दोन लाखाने फसवणूक केल्याची घटना १४ एप्रिल रोजी डोणगाव येथे घडली. सदर घटनेबाबत २२ एप्रिल रोजी डोणगाव पोलीस स्टेशनला दाखल तक्रारीवरून पोलीसांनी आरोपी महिलेविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे.

प्राप्त माहितीनुसार आसाराम रायभान कोल्हे वय ६७ रा.हाडप सावरगाव ता. येवला जि. नाशिक यांनी डोणगाव पोलीस स्टेशनला तक्रार दिली की, मी सेवानीवृत्त कर्मचारी असून मला प्रवीण नावाचा एक मुलगा आहे. मुलगा किराणा दुकाण चालवून त्याचा उदनीर्वाह करतो. १४ एप्रिल २०२५ रोजी दुपारी दरम्यान आरोपी मीना पवार हिने फोन केला व मला म्हणली की मी मिणा पवार बोलते मला माहिती मिळाली की, तुमच्या मुलाला लग्नाकरिता मुलगी शोधत आहात. माझी बहीण आहे.

मुलाचा बायोडाटा टाका असे म्हणली असता मी मुलाचा बोयोडाटा मोबाइलवर टाकला व तिने माझे मोबाइलवर तिचा बहीणीचा बायोडाटा टाकला. नंतर दोन तीन दिवसांनी परत फोन करुन मला म्हणाली की, माझे वडील दारु पितात व वडिलांनी दुसरी बोयको केली आहे. माझी आई व बहीण हे मेहकर जवळ खेड्यावर मामाकडे राहतात. व आम्हाला मुलगा पसंत आहे. आमची परिस्थिती खुप गरीबीची आहे. तरी पण मी आई सोबत बोलते व आईला ने कळवीले आहे की आपलला दोन लाख रुपये घे व मुलगी त्यांना दे मी त्यांना नकार दिला व म्हणलो की दिड लाख रुपये देतो असे म्हणालो तुम्ही उदया या मी व मुलगी सोबत आनते आपण लग्न करुन घेऊ असे म्हणून आम्ही व माझा भाऊ बाबासाहेब रायभान कोल्हे, मुलाचे मामा सुनिल सोपान गाडे असे २२ एप्रिल रोजी सकाळी मेहकर बस स्थानकावर आलो होतो. व सदर बाईला फोन केला असता तिने सांगीतले की मी आले बस स्थानकावर आले तुम्ही कोठे आहे. आम्ही मेहकर बस स्टेंडचे गेटवर आहोत.



आमची त्या बाईसोबत बस स्टँडवर भेट झाली. ती मला म्हणाली की,अपल्याला खेड्यावर जायचे आ असे म्हणून एमएच ४१ व्ही ४४११ क्रमांकाच्या माझ्या वाहनाने मेहकर वरुन डोणगाव येथे आलो, असता बस स्टँडवर आलो असता ती आम्हाला म्हणाली की नाझे नामा आलेला आहे. व फोनवर बोलत बाजुला निघुन गेली व परत आली व मामा सोबत आ ा ल ी व तो दारु पिलेला होता. डोणगाव मधील एका म्हातारीच्या घरी घेऊन गेली व तेथे आमची चर्चा झाली व तित्या घरा मधील इसमांना हे माझे पती आहे, आई आहे. व बहीण दाखविली व आम्हाला म्हणाली की, मुलगी पसंत आहे. का मी त्यान पसत आहे असे म्हणलो असता व ती म्हणली की ठरल्या प्रमाणे रक्कम मला द्या बाकीच्या कोणाला सांगू नका, मी तीला म्हणालो की, आम्ही तुला पन्नास हजार रुपये देतो असे म्हणलो असता मला तिने सांगीतले की मला पूर्ण पैसे द्या वरून मी तिला दिड लाख रुपये दिले.

मी म्हणलो की,आपण कोर्ट रजिस्टेशन करुन घेऊ ती चालेल म्हणाली नंतर ती व माझे भाऊ बाबासाहेब रायभान कोल्हे याचे सोबत स्टॅम्प आनण्यास गेली होती. स्टॅम्प आनले व म्हणली की, वकीला मार्फत करुन घेऊ असे म्हणून आम्ही मेहकर येथे कोर्टात गेलो होतो व तेथे माझे कडुन दीड लाख रुपये घेतले व तेथील वकीलाकडे गेलो असता त्या वकीलाने कळवीले की, तुम्हाला गावाकडेच येवाला येथे रजिस्टर मॅरेज करावे लागेल. मेहकर येथे होत नाही. असे असतांना आम्ही सर्व चहा पिण्यासाठी बसलो असता तेथे एक अनोळखी इसम फोर व्हीलर वाहन जोरात घेऊन आला व त्या गाडीमध्ये मिना पवार तिची बहीण बसून पळून गेल्या. व माझी फसवणूक केली आहे. अशा तकत्रारीवरून पोलीसांनी आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. घटनेचा पुढील तपास पोउपनी संदिप सावले करीत आहेत.